**नि.फौ.प्र. क्र. १०४७/२०१५**
**शासन–वि–अमोल व इतर**
**नि.क्र. ३४**

**<u>सरकार पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र. १ याची जबानी :–</u>**
मी याव्दारे शपथेवर कथन करते की –

| | |
|---|---|
| माझे नांव | :– वैशाली अमोल अडसुळ |
| वय | :– ३१ वर्षे, धंदा : – खाजगी काम, |
| राहणार | :– राजनगर, निगडी, पुणे. |

**<u>नि.क्र.१ वरील आदेशाप्रमाणे आरोपी लोकांना अजमानत वॉरंट काढण्यात आले आहे परंतु, साक्षीदाराला सदरचे प्रकरणाध्ये साक्ष द्यायची आहे व तीला कामावरुन सुट्टी मिळत नसल्यामुळे सरकारी वकिलांचे विनंतीवरुन आरोपी लोकांचे गैरहजेरीमध्ये साक्षीदाराचा सरतपास शपथेवर श्री. राठोड यांचेतर्फे शपथेवर सुरु</u>**

आरोपी क्र.१ हे माझे पती होते व आरोपी क्र.२ ही माझी सासु होती. माझे लग्न आरोपी क्र. १ सोबत सन २००७ मध्ये दि.२६.०४.२००७ रोजी सांगली येथे रितीरिवाजप्रमाणे झाले होते. लग्नानंतर मी आरोपीसोबत संजयनगर, सांगली येथे नांदण्याकरिता गेले होते. तेथे आमचेसोबत आरोपी क्र. १ व तिचे आई राहत होते.मी त्यांचेसोबत राहत असताना आरोपी क्र.१ व २ सोबत घरगुती कारणांवरुन आमचे वाद व्हायचे व आमचे एकमेकांशी पटत नव्हते त्यामुळे मी रागाच्या भरात आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे नाही. त्यावर माझी सही आहे. तक्रारीवरील सहीला **निशाणी क्र.३५** देण्यात येतो. आता मला छापिल एफ.आय.आर. दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे नाही. त्यावर माझी सही आहे. छापिल एफ.आय.आर. वरील सहीला **निशाणी क्र. ३६** देण्यात येतो. आता माझा आरोपी क्र.१ सोबत घटस्फोट झाला आहे.

**साक्षीदार सरकारी पक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीत विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझे तक्रारीमधील **<u>अधोरेखांकित भाग–अ</u>** माझे म्हणणे प्रमाणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला सदरची केस आरोपींविरुध्द पुढे चालवायची नाही व दुसरा कोणताही साक्षीदार तपासायचा नाही.

**उलटतपास नाही.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.01.15 11:50:30 +0530

**(अल अमुदी ए. के.)**
३ रे सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपरी, पुणे.

—समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM
Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM
Date: 2025.01.15 11:50:33 +0530

**( अल अमुदी ए. के.)**
३रे सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपरी, पुणे.

दि.१३.०१.२०२५